नवप्रभा

बुधवार दि. १७ जून २०१५

# हळबे महाविद्यालयात प्रवेश सुरू

दोडामार्ग (न. प्र.)

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्याक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे.

महाविद्यालयामध्ये पूर्व परीक्षा आणि प्रथम वर्ष कला या दोन शाखांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. लिहिता वाचता येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला पूर्व परीक्षा हा अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे पूर्व परीक्षा पास झालेल्या व्यक्तीला विद्यापीठाच्या प्रथम वर्ष कला आणि वाणिज्य शाखेमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. ही परीक्षा ऑनलाइन पद्धतीने असल्यामुळे त्याच दिवशी निकाल जाहीर करून दि. १७ ऑगस्ट पासून प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.

प्रथम वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून दि. २२ जुलैपर्यंत ही प्रक्रिया चालणार आहे. हळबे महाविद्यालयातील अभ्यास केंद्रावर विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या शुल्काव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही. पूर्व परीक्षेसाठी रु. ६५० इतके शुल्क आकारण्यात येईल. प्रथम वर्षासाठी रु. १६०० इतके शुल्क आकारण्यात येईल. अभ्यासकेंद्राचा मागील वर्षाचा निकाल १००% लागलेला आहे. अधिक माहितीसाठी महाविद्यालयामध्ये डॉ. पी. डी. गाथाडे (९४२१४५४११९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.